**राम नाईक**
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फैक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com

**कृपया प्रसिध्दीसाठी -** **7 ऑगस्ट 2008**

## राम नाईक, गोपाळ शेट्टी यांच्या प्रयत्नांमुळे कुष्ठपीडितांच्या अनुदानात वाढ व अन्य लाभ

**मुंबई, गुरुवार** : भाजपा नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक आणि मुंबई भाजपा अध्यक्ष व आमदार श्री.गोपाळ शेट्टी यांच्या सतत पाठपुराव्यानंतर उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी कुष्ठपीडित कुटुंबाचे मासिक अनुदान रु.600/- वरुन रु.750/- पर्यंत वाढविण्याचे मान्य केले आहे. याखेरीज कुष्ठपीडितांना अंत्योदय योजने अंतर्गत 20 किलो गहू व 15 किलो तांदूळ तसेच कुष्ठपीडित कुटुंबांतील तरुणांना रिक्षा परवाने देण्याचे उपमुख्यमंत्र्यांनी मान्य केल्याची माहिती श्री.राम नाईक यांनी प्रसिध्द केलेल्या निवेदनात दिली आहे.

श्री.राम नाईक व श्री.गोपाळ शेट्टी यांच्या आग्रहामुळे दोन वर्षांपूर्वी कुष्ठपीडितांचे मासिक अनुदान रु.250/- वरुन वाढवून रु.500/- केले गेले. तथापि, ज्या कुटुंबात दोन रुग्ण आहेत अशांना प्रत्येकी रु.500/- ऐवजी एकूण रु.600/- अनुदान देण्यात येत आहे. बहुतेकदा पति-पत्नी दोघेही कुष्ठपीडित असतात. त्यामुळे हे अनुदान रु.1,000/- पर्यंत वाढविले पाहिजे अशी कुष्ठपीडितांची मागणी होती. याबाबत गेली दोन वर्षे सतत पाठपुरावा केल्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी कुष्ठपीडितांच्या प्रतिनिधींशी पुन्हा एकदा चर्चा करुन हे अनुदान रु.750/- पर्यंत वाढविण्याचे मान्य केले आहे. या चर्चेच्या वेळी माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक, आमदार श्री.गोपाळ शेट्टी यांच्यासह बोरीवलीच्या संजयनगरचे अध्यक्ष श्री.भिमराव मधाळे, तुर्भेच्या अभिनव ज्ञान विद्या मंदिरचे उपाध्यक्ष श्री.रसुल मुल्ला, महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे उपाध्यक्ष श्री.बळीराम तांबडे व सदस्यव्दय श्री.भूपाल फिरगाने व श्री.प्रकाश मधाळे, तसेच सर्वश्री पंडित पाटील, शफी शेफ, निवृत्ती पारधी, आदींचा समावेश होता. महापालिका आयुक्त श्री.जयराज फाटकही या चर्चेच्यावेळी उपस्थित होते.

कुष्ठपीडितांचाही अंत्योदय योजनेत समावेश करुन त्यांना 20 किलो गहू व 15 किलो तांदूळ देण्याचे यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी मान्य केले. विशेष महत्त्वाचे म्हणजे गरीबी रेषेखालील लोकांप्रमाणे कुष्ठपीडितांनाही शिधावाटप दुकानांवर गहू प्रति किलो रु.2/- ने तर तांदुळ प्रति किलो रु.3/- ने पुरविण्याचे आदेश देण्याचेही उपमुख्यमंत्र्यांनी मान्य केले आहे. बोरीवलीच्या कुष्ठपीडितांना त्यांच्या वस्तीत शिधावाटप दुकान देण्याचेही श्री.पाटील यांनी यावेळी मान्य केले. आजही समाज कुष्ठरुग्णांकडे 'सामाजिक कलंक' या भावनेने पाहातो ही दुर्दैवी वस्तुस्थिती आहे. कुष्ठपीडितांना आणि त्यांच्या तरुण मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळेच या तरुणांना विशेष बाब म्हणून तातडीने रिक्षा परवाने देण्याचेही उपमुख्यमंत्र्यांनी मान्य केले आहे.

..2..

निवास : बी-503, लक्षचंडी अपार्टमेंट, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, कृष्णवाटिका रास्ता, गोकुळधाम, गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063 • दूरभाष : 022-2841 33 99, फैक्स : 022-2842 33 99

**राम नाईक**
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फैक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com



पूर्वी आश्वासन देऊनही अद्याप कुष्ठपीडितांच्या वस्त्यांचे सर्वेक्षण होऊन त्यांना फोटोपास मिळालेले नाहीत याकडे श्री.राम नाईक व श्री.गोपाळ शेट्टी यांनी उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. त्यानंतर यासाठी तातडीने कारवाई करण्याचे तसेच वसाहतीत जाऊन जनता दरबार घेण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री श्री.पाटील यांनी दिले. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर सदर वसाहतींची जमिन त्या-त्या संस्थेकडे वर्ग करण्याबाबत सहानुभूतिने विचार करण्याचे तसेच सर्वांना मोफत फोटोपास देण्याचेही श्री.पाटील यांनी मान्य केले. बहुसंख्य कुष्ठरुग्णांना आपल्या जखमांना मलमपट्टी करण्यासाठी शासकीय रुग्णालयांत जावे लागते. त्याऐवजी त्यांच्या वस्त्यांमध्येच या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याचे आश्वासनही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

कुष्ठपीडित कुटुंबातील विद्यार्थ्यांनी गेल्या शैक्षणिक वर्षी भरलेली फी परत करण्यात येईल, तसेच यंदा त्यांना फी माफी देण्यात येईल असेही उपमुख्यमंत्री श्री.पाटील यांनी सांगितले. नवीन सवलती देत असताना दोन वर्षापूर्वि मान्य केलेले तुर्भे येथील कुष्ठपीडितांच्या शाळेचे रु. एक लाख अनुदान अद्याप मिळालेले नाही याकडे लक्ष वेधल्यानंतर ते तातडीने देण्याचे आदेशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न : छायाचित्र**

निवास : बी-503, लक्षचंडी अपार्टमेंट, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, कृष्णवाटिका रास्ता, गोकुळधाम, गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063 • दूरभाष : 022-2841 33 99, फैक्स : 022-2842 33 99